# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/ 146 /2015** **Dt:21/9/2015**

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: १००% केंन्द्र शासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेज ॲड युनिव्हर्सिटी स्टुडंट्स सन २०१५–१६.**

संदर्भ: शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) परिपत्रक क्र. उशिस/१४अई/सीएसएस/ २०१४–१५/८८८७ दि. ०८/०९/२०१५.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, १०० टक्के केंन्द्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेज ॲड युनिव्हर्सिटी स्टुडंट्स सन २०१५–१६ याबाबतीत प्राप्त परिपत्रक अवलोकनार्थ व उचित कार्यवाहीस्तव आपणास पाठवित आहे.

कृपया विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने प्रसिद्धी द्यावी व परीपत्रकानुसार उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे.

धन्यवाद!

आपला

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

**सहपत्रे:– वरीलप्रमाणे**

**प्रत माहितीस्तव :–**

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१२११५३

क्र. उशिसं/१४अई/सीएसएस/२०१४-१५/ ४४४७ दि. 08 SEP 2015

परिपत्रक :-

विषय : **१०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्कीम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेज ॲण्ड युनिर्व्हसिटी स्टुडंटस् सन २०१५-१६.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी /मार्च २०१५ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीचे अर्ज (Fresh) ऑनलाईन (Online) पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑफलाईन (Offline) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

- **नविन मंजूरी (Fresh):**

१. नवीन मंजूरीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. २. नवीन मंजूरीचा अर्ज करण्यासाठी सदर विद्यार्थ्यांचे नाव www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरील पात्रता यादीमध्ये असणे आवश्यक आहे. **सदर यादीमध्ये नाव नमुद असलेले विद्यार्थीच नवीन मंजूरीचा ऑनलाईन अर्ज करणेसाठी पात्र आहेत.** ३. नवीन मंजूरीसाठी अर्जाची हार्ड कॉपी कोणत्याही कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. ४. नवीन मंजूरीचा अर्ज करण्याची विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द जाहिरातीचे व सुचनांचे अवलोकन करावे.

- **शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) :**

१. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६० % किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. २. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाउनलोड करावा व परिपूर्णरीत्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दि.२०.१०.२०१५ पर्यंत जमा करावा. ३. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज दि. २५.१०.२०१५ पर्यंत संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१५-१६ च्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबधीत प्राचार्य/संस्था प्रमुख यांची असेल. आपल्या अधिनस्त महाविद्यालयात/संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त

विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अर्जदाराच्या सोईसाठी मार्गदर्शक सूचना व अर्जाचा नमुना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांचे स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विभागप्रमुखांना कार्यशाळा, बैठका आयोजित करुन सूचना देण्यांत याव्यात व झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या संचानलायास सादर करण्यात यावे. सोबत सदर शिष्यवृत्तीच्या जाहीरातीचे प्रारुप जोडले आहे.

**(डॉ. धनराज माने )**
नोडल ऑफिसर तथा शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १.
३. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर भांबुर्डा, पुणे-५.
४. प्रबंधक, नर्सिंग कौन्सिल, मुंबई
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, सीएसटी जवळ, मुंबई -१.
६. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. संचालक, आरोग्य संचालनालय, नविन प्रशासकीय इमारत, महा. राज्य., पुणे.
८. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषी/तंत्र/पशु विज्ञान/आरोग्य विज्ञान)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. ............ दिनांक ............
जावक क्र. ............ दिनांक ............

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

# भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०१५-१६

## जाहिरात

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी /मार्च २०१५ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीचे अर्ज** (Fresh) **ऑनलाईन** (Online) **पध्दतीने व शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑफलाईन** (Offline) **पध्दतीने** मागविण्यात येत आहेत.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षेपर्यंतच व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षेपर्यंत देय राहील.

६. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बँक खात्यामध्ये केंद्र शासना कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या बँकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय. एफ. एस. सी. कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज फेटाळण्यात येईल.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जॉईंट खाते नसावे. स्टेट बँक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शून्य रकमेवर बँक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.

८. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्यांची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/ वसुल केली जाईल.

- **नविन मंजूरी** (Fresh) **:**

१. नवीन मंजूरीसाठी विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

२. नवीन मंजूरीचा अर्ज करण्यासाठी सदर विद्यार्थ्यांचे नाव **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावरील केंद्रशासनाने प्रसिध्द केलेल्या पात्रता यादीमध्ये असणे आवश्यक आहे. सदर यादीमध्ये नाव नमुद असलेले विद्यार्थीच नवीन मंजूरीसाठी ऑनलाईन अर्ज करणेसाठी पात्र आहेत.

• **शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) :**

१. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६० % किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

२. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचे नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द अर्ज डाउनलोड करावा व परिपूर्णरीत्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दि.२०.१०.२०१५ पर्यंत जमा करावा.

४. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज दि. २५.१०.२०१५ पर्यंत संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.

५. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

६. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागिल वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

७. आधार कार्ड क्रमांक (असल्यास) छायांकित प्रत जोडावी.

❖ **नवीन मंजूरी (Fresh) साठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :**

१) सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना नवीन मंजूरीचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास त्याचे नाव **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावरील पात्रता यादीमध्ये नमुद असणे आवश्यक आहे. सदर यादीमध्ये नाव नमुद असलेले विद्यार्थीच नवीन मंजूरीसाठी ऑनलाईन अर्ज करणेसाठी पात्र आहेत.

३) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बारावीच्या मार्कशीटवर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकुन नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Temporary Application ID प्राप्त होईल. हा ID (आय.डी.) वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा ID विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे. (अर्ज करताना महाविद्यालयाच्या यादीमध्ये आपल्या महाविद्यालयाचे नाव नसेल तर प्राचार्यांशी महाविद्यालयाच्या नावाच्या नोंदणीसाठी संपर्क साधावा.)

४) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

५) ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी.

६) नवीन अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑन लाइन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे (उदा.विद्यार्थ्याचा फोटो, मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, आधार कार्ड असल्यास इत्यादी) स्कॅन करुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

७) नवीन मंजूरीसाठी ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

८) विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी त्यांच्या अर्जाची हार्ड कॉपी पाठविण्याची आवश्यकता नाही.

## ❖ महाविद्यालय स्तरावर अर्ज पुढे पाठविण्याची कार्यपद्धती :

**अ)** विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची सविस्तर कार्यपध्दती **www.scholarships.gov.in** आणि **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर दिलेली आहे. संबंधित महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती त्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन तपासून घ्यावी. त्यानंतर पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीत तात्काळ पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावे.

**ब)** नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयास प्राप्त झालेनंतर त्याने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन अर्जाची छाननी करावी. त्यानंतर नुतनीकरणासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची हार्ड कॉपी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे दि.२५/१०/२०१५ पुर्वी पाठविण्यात यावेत.

## ❖ महाविद्यालय/संस्थेच्या ऑनलाईन नोंदणीसाठी :

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांची नावे सदर वेबसाईटवर दिसतात त्यांनी नव्याने ऑनलाईन नोंदणी न करता त्यांचा युजर आय.डी व पासवर्ड प्राप्त करुन घेण्यासाठी पुढील विहित प्रपत्रातील माहिती भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीची स्कॅन कॉपी नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshipcss@gmail.com** वर पाठवावी.

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांचे नाव **www.scholarships.gov.in** या वेबसाइटवर दिसून येत नाही त्यांनी संकेतस्थळावरील ऑनलाईन नोंदणीसाठी आपल्या महाविद्यालय/संस्थेची संपुर्ण माहिती ऑनलाइन भरावी तसेच खालील प्रपत्रामधील (Proforma) माहिती भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सदर प्रपत्राची तसेच महाविद्यालयाच्या शासन मान्यतेची प्रत स्कॅन करुन नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshipcss@gmail.com** वर पाठवावी.

शासनमान्य महाविद्यालये/संस्था यांनी त्यांचा कार्यालयीन ई-मेल आय.डी. व प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक संचालनालयाच्या वरील ई-मेल आय.डी. वर सादर केल्यानंतरच त्यांना त्यांच्या महाविद्यालय/संस्थांचा युजर आय.डी. व पासवर्ड ई-मेल / एसएमएसद्वारे ऑनलाईन प्राप्त होईल. सदर प्रपत्राच्या सर्व रकान्यातील माहिती भरणे अनिवार्य आहे.

### प्रपत्र (PROFORMA) for **Central Sector Scholarship**

| INFORMATION OF THE INSTITUTE /COLLEGE FOR USER ID/PASSWORD OF POST MATRIC SCHOLARSHIP | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | College/ Institute Name (as enrolled on website)) | Institute code/AISHE code/ Registration no. (as enrolled on website ) | Govt. / Govt. Aided / Private | Whether College Jr. / Sr. | Course Name/ Faculty with duration | University Name | Institute Address with Taluka & Pin Code | Inst .District | Details of the Principal/ Director | | | Details of the Staff handling Scholarship | | |
| | | | | | | | | | Name | Mobile No. | College E-mail | Name | Mobile No. | College E-mail |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |

Principal's Signature and Stamp

**महाविद्यालयांनी त्यांच्या नावाचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन www.scholarships.gov.in या वेबसाइटवर करुन उपरोक्त प्रपत्र व महाविद्यालयास शासनाची मान्यता असलेबाबतचे पत्र या संचालनालयाच्या scholarshipcss@gmail.com या ई-मेलवर दि. ०५.१०.२०१५ पर्यंत पाठवावे.**

❖ वेळापत्रक (Time line) :

## १. नवीन मंजूरीसाठी (Fresh):

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन ॲप्लिकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचा व येणाऱ्या सूचनेनुसार अर्जासोबतची कागदपत्रे अपलोड करण्याचा अंतिम दिनांक | दि. २०/१०/२०१५ |
| २. | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जास महाविद्यालयाने ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | दि. २५/१०/२०१५ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी जाहिरातीनुसार अंतिम दिनांकाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची तपासणी करून त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

## २. नुतनीकरणासाठी (Renewal):

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी www.dhepune.gov.in या संकेत स्थळावरुन अर्जाचा नमुना डाउनलोड (Download) करून परिपूर्ण रित्या भरुन आवश्यक त्या सहपत्रांसह महाविद्यालय/ संस्थेच्या प्राचार्यांकडे सादर करणे. | दि. २०/१०/२०१५ |
| २. | विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाची महाविद्यालयाने/संस्थेने तपासणी करुन सदर अर्ज सहपत्रांसह संबंधीत सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे सादर करणे. | दि. २५/१०/२०१५ |
| ३. | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन त्यास मंजुरी देणे व पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमुन्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास जमा करण्याचा कालावधी | दि. ३०/१०/२०१५ |

अधिक माहितीसाठी www.scholarships.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या **helpline no. 040-23120500/501/502/503/504/505** या क्रमांकावर किंवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

**(डॉ. धनराज माने )**
नोडल ऑफिसर तथा संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.